## कै अँड. वामन अनंत रेगे वाड्मयीन पुरस्कार

नियमावली ( स्पर्धकांसाठी )

२. १. पुरस्काराचे नाव "कै अँड. श्री वामन अनंत रेगे वाड्मयीन पुरस्कार"असे असेल.

२. २. पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम (धनादेशाने ) व शाल - श्रीफळ - मानपत्र यास्वरुपात राहील.

२. ३. त्या त्या वर्षाचा पुरस्कार शक्यतो संस्थेच्या वार्षिक समारंभात वा अन्य कार्यक्रमाद्वारे जाहीरपणे समारंभाच्या अध्यक्षांचे हस्ते वा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दिला जाईल

२. ४. निवड समिती पुढील प्रमाणे राहील.

(अ) देणगीदार वा त्याचा एक प्रतिनिधी.,

(ब) संस्थेचा एक प्रतिनिधी - कार्यकारी मंडळाने बहुमताने निवडलेला

(क) महाराष्ट्र साहित्य परिषद, ठाणे शाखा यांच्यातर्फे एक प्रतिनिधी.

२. ५ . त्या त्या वर्षीच्या निवड समिती सदस्यांना (परीक्षकांना ) त्या त्या वर्षीच्या स्पर्धेत भाग घेता येणार नाही. पुस्तकाचा मूळ वा दुय्यम लेखक,प्रकाशक,सर्वाधिकारी वा या सर्वांचे जवळचे नातेवाईक तसेच पुस्तकांचा प्रस्तावनाकार,भाष्यकार ( वा आधीच त्या पुस्तकाने ज्याने परिक्षण केले आहे असा समीक्षक) वा अशा पुस्तकाचा आधार घेवून ज्याने आपली साहित्यकृती निर्माण केली आहे अशी व्यक्ति निवड समितीवर कार्य करण्यास अपात्र असेल.

मात्र यासंबधीची माहिती परीक्षकानेच परीक्षकाचे काम स्वीकारण्यापूर्वी द्यावी अशी अपेक्षा आहे. स्पर्धकानेच आपले पुस्तक कोठल्या (ललित वा ललितेतर)गटातील पुरस्कार स्पर्धेसाठी पाठविले आहे याचा उल्लेख अर्जात करावा. शंकास्पद परिस्थितीत मात्र एखादे पुस्तक ललित गटातील आहे का ललितेतर गटातील आहे याचा निर्णय परीक्षक व / वा निवड समितीच घेईल व तो निर्णय स्पर्धकांवर बंधनकारक असेल.

२. ६ . ठाणे जिल्ह्यात कायम वास्तव्य करणाऱ्या लेखकांनाच या स्पर्धेत भाग घेता येईल.

२. ७. पुरस्कारासाठी गत अर्थिक वर्ष - म्हणजे ०१ जानेवारी ते ३१ डिसेंबर हिशेबात धरले जाईल. उदा २०२२. च्या पुरस्कारासाठी १ जानेवारी २०२२. ते डिसेंबर २०२२. या काळात प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचा विचार केला जाईल. या काळातील ती त्या पुस्तकाची प्रथमावृत्ती असणे अत्यंत आवश्यक आहे. फक्त छापील स्वरुपातील पुस्तकेच स्वीकारली जातील.

२. ८ . पाठ्यपुस्तके, शोध निबंध - प्रबंध ( शास्त्रीय व तांत्रिक स्वरुपाचे ) यांचा तसेच मासिके, नियतकालिके, अंक इत्यादी मध्ये प्रसिद्ध झालेल्या साहित्याचा विचार पुरस्कारासाठी केला जाणार नाही मासिके, नियतकालिके,अंक इत्यादी मध्ये प्रसिद्ध झालेले ललित वा ललितेतर

गटात बसू शकणारे साहित्य नंतर पुस्तक रुपाने प्रसिद्ध झाले असल्यासच स्पर्धेसाठी पात्र राहिल. येथे नियम क्र २. ७. ही पहावा.

२. ९. पुस्तके केवळ मराठी वा संस्कृत भाषेतील असली पाहिजेत.

२. १० . प्रत्येक पुस्तकाच्या ३-३.प्रती नि:शुल्क पाठवाव्या लागतील. एकापेक्षा अधिक साहित्यकृती लेखक स्पर्धेसाठी सादर करु शकेल व त्या नियमात बसत असतील तर स्वीकारार्ह राहतील.

मात्र प्रत्येक साहित्यकृतीसाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल. तसेच प्रत्येक साहित्यकृतीच्या

३-३. प्रती नि:शुल्क पाठवाव्या लागतील. स्पर्धेसाठी, प्रवेशमूल्य असणार नाही. स्पर्धकांनी

पाठविलेल्या ३ प्रति पैकी दोन प्रती पुरस्कार जाहीर झाल्या दिनांकापासून दोन महिन्यात स्पर्धकांनी अर्ज करुन परत मागितल्यास त्याला त्या परत देण्यात येतील. सदर प्रती दोन महिन्यात नेण्याची व्यवस्था स्पर्धकाने स्वत: करावयाची आहे. स्पर्धकाची इच्छा असल्यास व संस्थेस जरुर असल्यास या दोन वा दोन मधील एक प्रत संस्था सवलतीत खरेदी करेल. सवलतीची टक्केवारी कार्यकारी मंडळ प्रतिवर्षी ठरवेल. या दोन

प्रती हव्या आहेत का; त्या संस्थेला नि:शुल्क भेट द्यावयाच्या आहेत का; त्यातील एक वा दोन `प्रती संस्था ठरवील त्या सवलतीत विकायची इच्छा आहे का याचा उल्लेख स्पर्धकाने त्याच्या प्रेवेश अर्जात स्पष्टपणे करावयाचा आहे. याबाबत संस्थेचा निर्णय अंतिम असेल.

२. ११ . पुरस्कार प्राप्त पुस्तक एकापेक्षा अधिक लेखकांनी लिहिले असल्यास पुरस्काराची रक्कम सम प्रमाणात वाटून दिली जाईल. पुरस्कार, पुरस्कार प्रदान समारंभानंतर ३० दिवसांच्या आत न नेल्यास तो कुठलीही वेगळी सुचना न देता पुरस्कार निधीत जमा करण्यात येईल.

२. १२. पुरस्कार प्राप्त पुस्तकाचा लेखक ह्यात नसेल तर पुरस्कार त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीला देण्यात येईल. या बाबतचा योग्य पुरावा अर्जाबरोबर वा पुरस्कार प्रदान सोहळ्यापूर्वी कमीत कमी दिवस आधी संस्थेच्या कार्यालयात सादर करावा लागेल.

२. १३. पुस्तकावर उल्लेख नसेल तर साहित्यिकाची प्रथम आवृत्ती त्या त्या आर्थिक वर्षात प्रकाशित झाल्याचा पुरावा वेगळा सादर करावा लागेल.

२. १४ . एखादे वर्षी एक वा दोन्ही विभागांसाठी(ललित व ललितेतर ) पुरस्कार पात्र साहित्यकृती आढळली नाही तर ठेवीवर मिळालेले वार्षिक व्याज वा पुरस्काराची रक्कम(वजा प्रशासकीय खर्च) मूळ ठेवीत समाविष्ट केले जाईल. मुदतीत न नेलेल्या पुरस्काराची रक्कमही मूळ ठेवीत जमा केली जाईल. तसेच या दोन विभागात प्रथम पुरस्कारासाठी एकमेव साहित्यकृती न आढळल्यास बक्षिस विभागून देण्याचा हक्क निवड समितीस राहिल.

२. १५. निवड समितीने बहुमताने घेतलेले पुरस्कार देण्याबाबतचे निर्णय अंतिम व बंधनकारक असतील व निवडलेल्या वा न निवडलेल्या पुस्तकांच्या निर्णया बद्दल कुठलीही कारणमिमांसा देण्यास निवड समिती व /वा संस्था बांधील नसेल.

२. १६ . पुरस्कारा संबंधात नियम करण्याचे, ते सुधारण्याचे वा गाळण्याचे

वा नवीन नियम समाविष्ट करण्याचे स्वातंत्र्य संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाला असेल, मात्र असे सर्व बदल त्या त्या वर्षीच्या पुरस्कारासाठी साहित्यकृती मागविण्यापुर्वी बहुमताने घेतलेले असतील.

२. १७ . पुरस्कारासाठी साहित्यकृती सादर करताना वरील सर्व नियम वाचून समजावून घेतले असून ते मान्य असल्याबद्दल स्वत: लेखकास/लेखकांस/ त्याच्या प्रतिनिधीस सही करुन प्रवेश अर्ज पुर्णपणे भरुन द्यावा लागेल. अपुर्ण अर्ज, पुस्तकाच्या कमी प्रति, विहित वेळेत प्राप्त न झालेले अर्ज व साहित्य कृती पुरस्कारासाठी विचारार्थ घेतल्या जाणार नाहीत. अर्ज व प्रत्येक पुस्तकांच्या तीन- तीन प्रति एकाच वेळेस सादर करावयाच्या आहेत. टपालाद्वारा अर्ज पाठवले जाणार नाहीत.

२. १८. सदर पुरस्कार प्राप्त लेखक परत सदर पुरस्कार प्राप्तीस पात्र असणार नाही. मात्र दोन पैकी (ललित /ललितेतर) एका गटात आधी पुरस्कार प्राप्त असेल तर दुसऱ्या गटासाठी स्पर्धेत भाग घेऊ शकेल व फक्त त्या गटातील पुरस्कारासाठी स्पर्धेस पात्र राहिल. ज्या लेखकाना दोन्ही गटातून सदर पुरस्कार केव्हाना केव्हा प्राप्त झाला असेल तर मात्र या स्पर्धेत ते परत केव्हाही भाग घेऊ शकणार नाहीत.

२. १९. लेखकाचा/ स्पर्धकाचा व /वा प्रकाशकाचा पत्ता अथवा दुरध्वनी क्रमांक बदलल्यास त्याची माहिती संस्थेस ताबडतोब दूरध्वनीवरुन व लेखी कळवावी

२. २०. या संबंधीचा सर्व पत्रव्यवहार व संपर्क, मराठी ग्रंथ संग्रहालय- ठाणे, सरस्वती मंदिर, पहिला मजला, सुभाष पथ, जिल्हा परिषदेसमोर, ठाणे (प)४००६०१ .येथे कार्यालयीन वेळेत करावा.

भ्रमणध्वनी :- ९७६८२५७५७५ /९३२६६६४७७० /८७७९६९६७९६